स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

वाणिज्य विद्याशाखेंतर्गत पीएच.डी. पदवीसाठी सादर करावयाच्या

शोधप्रबंधाचा संक्षिप्त आराखडा

संशोधन विषय

“पुणे जिल्ह्यातील महिला सक्षमीकरणात महिला उद्योजकांची भूमिका (विशेष अभ्यास 2015-2025)”

संशोधक

दीपाली दीपक दीक्षित

एम.कॉम., बी.एड

मार्गदर्शक

प्रा.डॉ.एच.डब्लू कुलकर्णी

एम.कॉम, एम.फिल., पीएच.डी.

वाणिज्य विभागप्रमुख

शिवाजी महाविद्यालय, उदगीर जि.लातूर

संशोधन केंद्र

शिवाजी महाविद्यालय, उदगीर जि.लातूर

ऑगस्ट 2023

“पुणे जिल्ह्यातील महिला सक्षमीकरणात महिला उद्योजकांची भूमिका(विशेष अभ्यास 2015-2025)”

प्रस्तावना

गेल्या काही दशकांमध्ये भारतीय महिलांनी विविध क्षेत्रात विशेष पुरुषप्रधान मानल्या जाणाऱ्या या क्षेत्रात स्वत:साठी एक आदर्श निर्माण केला. त्या क्षेत्रात त्यांनी पुरूषांनाही दोन पावले मागे सोडले आहे. तरीही महिलांना 33 टक्के आरक्षण मिळण्यास खूप कालावधी लागला. या मुद्याला विरोध करणाऱ्यांनी महिलांच्या शारीरिक, मानसिक आणि भावनिक क्षमतेवर शंका उपस्थित केली. स्त्री स्वातंत्र्याच्या बाबतीत मागासलेपण नक्कीच आहे. ग्रामीण भागातील महिलांचे जीवन आजही 'चुल आणि मूल' एवढ्यापुरते मर्यादित राहिली होती. त्यांना जाणीवपूर्वक शिक्षणापासून दूर ठेवले जाते. तिला अजूनही पतीच्या परवानगीशिवाय बाहेर पडण्याचे स्वातंत्र्य नाही. महिलांना सक्षम बनवण्यासाठी होत असलेल्या प्रयत्नांमध्ये बचत गटाची भूमिका महत्त्वाची आहे.

आजही ग्रामीण भागातील परिस्थिती दयनीय आहे. आजही मोठी लोकसंख्या दारिद्रयरेषेखाली जगत आहे. कर्जामुळे भूमिहीन आणि अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा क्रम सुरूच आहे. दोन वेळची भाकरी मिळवण्यासाठी मजुरांना काबाडकष्ट करावे लागते. सावकाराच्या कर्जामुळे घरचा माणूस दुबळा झाला तर घरची परिस्थिती सुधारण्यासाठी महिलांनाच पुढे यावे लागेल. अशा महिलांना बचत गटांनी प्रगतीचा मार्ग दाखविला.

राज्याच्या आर्थिक विकासात महिला उद्योजकता महत्त्वाचा स्रोत मानला गेला आहे. महिला उद्योजक समाजामध्ये व्यवस्थापन संघटन व्यवसायाशी संबंधित बाबी मध्ये कार्य करीत आहेत.आजचा आधुनिक व गतिमान युगात शाश्वत आर्थिक विकासाच्या जागतिक वाटचालीमध्ये महिला उद्योजकांची महत्त्वाची भूमिका आहे. सद्य स्थितीत महिला उद्योजकांपुढे लिंगभेद व समाजातील स्थान ,व्यवसाय सुरू करण्यासाठी अपुरे स्रोत, तांत्रिक व्यवसायिक ज्ञानाचा अभाव, मर्यादित आर्थिक स्तोत्र, गुंतवणूक सहाय्य परवडण्याजोगा व सुरक्षित व्यावसायिक जागांचा अभाव इत्यादी अनेक आव्हाने आहेत. राज्याच्या सर्व समावेशक महिला चलीत उपक्रमांचाद्वारे आर्थिक बदल घडवण्यास प्रोत्साहन देणारे जागतिकदृष्ट्या सक्षम व्यवसाय केंद्र बनविणे व महिला उद्योजकांसाठी पोषक वातावरण निर्माण करणे यादृष्टिकोनातून महिला उद्योजकांसाठी सक्षम धोरण राबवण्यात आले.

" पुणे जिल्ह्यात राज्यातील सर्वाधिक 22,256 बचत गट आहेत. यामध्ये मागील दोन वर्षात त्यांची संख्या वाढलेली दिसून येते. जिल्ह्यातील 22,256 पैकी 13,814 बचत गट आहे. कर्ज घेण्यास पात्र ठरले आहे. 2020 पर्यंत जिल्ह्यात केवळ 10,000 बचत गट कार्यरत होते. आता त्यात 12,000 बचत गटांची नव्याने स्थापना करण्यात आली. महिला सक्षमीकरणामध्ये बचत गटाच्या माध्यमातून अनेक महिला उद्योगांना प्राधान्य देण्यात आले. तुम्ही आणि गरीब महिलांना रोजगार प्रशिक्षण, कर्ज पुरवठा, गरिबी निर्मूलन, साक्षरता आणि आरोग्यविषयक माहिती इत्यादी विविध उद्दिष्टे साध्य केली जातात. महिला उद्योजक बचत गटांनी तयार केलेल्या वस्तूंच्या विक्रीसाठी बाजारपेठ उपलब्ध करून देणे, मिलनसाठी कार्यशाळा आयोजित करणे, त्यांनी बनविलेल्या वस्तूंचे प्रदर्शन, आणि वस्तूंच्या विक्रीसाठी मार्गदर्शन करना याबद्दलचे कार्य करतात."

महिला सक्षमीकरण :

महिला उद्योगामुळे महिलांच्या आर्थिक गरजा पूर्ण करण्यासाठी प्रयत्न केले जातात. महिलांना मिळणारे प्रशिक्षण त्यांना त्यांच्या सर्वांगीण विकासाकडे घेऊन जाते. महिला उद्योजक महिलांना केवळ आर्थिक आधार देत नाहीत तर त्यांच्या भावनिक आणि मानसिक स्तरावरील प्रगतीसाठी प्रयत्नशील असतात. त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करणे.यापलीकडे जाऊनही काही महिला इतरांसाठी आदर्श बनतात. त्या गटाचे नेतृत्वकरतात. गटातील महिलांसाठी त्यांचा निर्णय अंतिम निर्णय आहे. त्यामुळे गावातील इतर महिलांनाही घराबाहेर काम करण्यास आणि निर्णय घेण्यास सक्षम होते. महिलांना त्यांच्या पायावर उभे करण्यासाठी कमाईचे विविध पर्याय आवश्यक आहेत. असे पर्याय देताना त्या महिलांचे शिक्षण आर्थिक परिस्थिती भौगोलिक स्थिती व्यवसाय इत्यादी बाबी विचारात घेतल्या जातात. आपल्या आयुष्यातील छोट्या छोट्या समस्यांमुळे निराश झालेल्या महिला कोणत्याही मोठ्या अडचणींना तोंड देण्यासाठी तयार असतात ही क्षमता महिला उद्योगामुळे शक्य होते.

महिला उद्योजकतेतील 10 योजना :

व्यवसाय सुरू करण्यासाठी भांडवल हा एक महत्त्वाचा घटक आहे आणि अनेक बँका महिला उद्योजकांसाठी तारण सुरक्षा व्याजदर इत्यादी बाबतीत थोडा वेगळा आणि अधिक लवचिक साठी आणि शर्तींसह विशेष कर्ज देतात. उद्योजक होण्याच्या बाबतीत महिलांना सतत अडथळ्यांना तोंड द्यावे लागते.?महिलांना स्वतःचा व्यवसाय सुरू करणे सोपे व्हावे या उद्देशाने सरकारने प्रयत्नशील घोषणा केली आहे त्यामध्ये खालील 10 योजना महत्वाच्या आहेत.

- महिला उद्योजकता मंच
- भारतीय महिला बँक व्यवसाय कर्ज

- व्यापारसंबंधित उद्योजकता सहाय्य आणि विकास योजना
- प्रधानमंत्री रोजगार योजना
- स्त्रीशक्ती पॅकेज
- देना शक्ती योजना
- उद्योगिनी योजना
- अन्नपूर्णा योजना
- सेंट कल्याणी योजना
- महिला उद्योग निधी योजना

विषयनिवडीची कारणे :

- पुणे जिल्हयात 14 तालुक्यांचा समावेश असून जिल्हयाची व्याप्ती पाहता तालुकानिहाय महिला उद्योजकांचा अभ्यास करणे आवश्यक ठरते.
- महिला उद्योजकाच्या भूमिकेतून महिला सक्षमीकरण अभ्यासणे गरजेचे आहे.
- महिला सक्षमीकरणात महिला उद्योजक महत्त्वाची भूमिका बजावत आहेत.
- महिला उद्योगांना शासनातर्फे प्रोत्साहन मिळत असून त्यांच्या विविध योजनांचा फायदा महिलांना होत आलेला दिसून येतो.
- पुणे जिल्हयातील महिलांची आर्थिक स्थिती महिला उद्योगांतील सहभागामुळे सुधारलेली दिसून येते.

संशोधनाचे महत्त्व :

- महिलांना समाजात दुय्यम स्थान असल्यामुळे अनेक क्षेत्रात त्यांना संधी दिली जात नव्हती मात्र महिला उद्योगामुळे त्यांना आर्थिक विकासाची संधी उपलब्ध झाली..
- स्थानिक पातळीवर महिलांना रोजगार उपलब्ध करून देण्यास महिला उद्योजक महत्त्वाची भूमिका बजावत आहेत.
- महिला उद्योजकमुळे महिलांचे सक्षमीकरण मोठ्या प्रमाणात घडून येत असल्याचे दिसून येते त्यामुळे सामाजिक प्रगतीला हातभार लागत असल्याचे आढळून येते.

संशोधनाचे उद्देश :

- पुणे जिल्ह्यातील महिला सक्षमीकरणात महिला उद्योजकाची भूमिका कार्यपद्धतीचा अभ्यास करणे.
- महिला उद्योजकांच्या माध्यमातून आर्थिक प्रगतीचा अभ्यास करणे.
- राज्य व केंद्र शासनाचे धोरण, बँक ,बचत गट वित्तीय संस्था, यांच्यातील व्यवहाराचा अभ्यास करणे.
- महिला उद्योजकांच्या माध्यमातून झालेली महिला सबलीकरण अभ्यासणे.

गृहीतके :

- रोजगारसंधीत वाढ होते.
- आर्थिक सबलता येते.
- कामाची विभागणी होते व कामाचा ताण पडत नाही.
- बचतीची सवय लागते.
- व्यवस्थापन कौशल्या आणि ज्ञानाचे फायदे मिळतात.
- उद्योजकतेला चालना मिळते.
- छोटी व्यवसाय सुरू करण्यासाठी प्रोत्साहन दिले जाते.

संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :

आर्थिक अडचण,मनुष्यबळाचा अभाव, वेळेची कमतरता या बाबींचा विचार करून संशोधनाचे कार्य पुणे जिल्ह्यातील 14 तालुक्यातील 500 महिला उद्योग त्यासाठी कार्यरत असणार्या महिला उद्योजकांच्या कामाची विभागणी एस सी, एस टी,ओबीसी आणि इतरएवढ्यापुरतीच मर्यादित आहे.

सदरील अभ्यास हा पुणे जिल्ह्यातील महिला उद्योजकांच्या व्यवस्थापनापुरता मर्यादित आहे. यामध्ये विविध प्रकारे केला जाणाऱ्या गुंतवणूकीचा तसेच बचतीचा अभ्यास करण्याचा कालावधी 2015 ते 2025 हा आहे. यामध्ये महिला सक्षमीकरणाबाबत महिला उद्योजकाची भूमिका याचा अभ्यास केला जाईल.

संशोधन पद्धती :

- **प्राथमिक सामग्री :**

बचत गटांतर्गत चालवले जाणाऱ्या महिला उद्योगातील उद्योजकांच्या जमाखर्च पुस्तके, तोंडी मुलाखती, प्रश्नावली, निरीक्षण इत्यादी माध्यमातून प्राथमिक सामग्रीचे संकलन केली जाईल.

- **दुय्यमसामग्री :**

दुय्यम माहितीचे संकलन, मासिके, राज्य व केंद्र सरकारचे अहवाल, शासकीय रेकॉर्ड, वर्तमानपत्र, पुस्तक, आयोग, परिषदा, इंटरनेट इत्यादी माध्यमातून केले जाईल.

नमुना निवड

संशोधनासाठी बचत गटा अंतर्गत काम करणाऱ्या 500 महिला उद्योजकांची निवड करण्यात आली आहे .यात एस. सी. एस .टी .ओबीसी व इतर चार भागात तालुका निहाय महिला उद्योजकांच्या कार्याचा अभ्यास केला जाईल .पुणे जिल्ह्यातील 14 तालुक्यामधून सरासरी दहा ते सात यानुसार एकूण पाचशे उद्योजकांची संशोधनासाठी नमुना म्हणून निवड करण्यात येईल.

तक्ता क्र.1.1

अ.क्र.	**तालुके**	उद्योजकांची संख्या
1	**पुणे शहर**	60
2	**हवेली**	60
3	**बारामती**	30
4	**मुळशी**	30
5	**शिरुर**	20
6	**मावळ**	30
7	**दौंड**	40
8	**इंदापूर**	60
9	**भोर**	40
10	**वेल्हा**	20
11	**पुरंदर**	60
12	**खेड**	20
13	**जुन्नर**	10
14	**आंबेगाव**	20
	एकूण	500

पुणे जिल्हा

♣ सांख्यिकीय तंत्र

प्रथम व दुय्यम पद्धतीने गोळा केलेल्या माहितीचे वर्गीकरण करून विविध सांख्यिकीय तंत्रामध्ये कोष्टके, आलेख, प्रमाण विचरण, सहसंबंध गुणक, केंद्रीय प्रवृत्तीची परिमाणे इत्यादी तंत्राचा वापर केला जाईल.

प्रकरण रूपरेषा

1) महंमद युनूस (अनुवाद शरद पाटील) बँकर टू द पुअर (बँक गरिबांच्या दारात), सुविद्या प्रकाशन, सोलापूर, 2007
2) एम.यु. मुलानी, महिला स्वयंसहाय्यता बचत गट, डायमंड पब्लिकेशन, पुणे, 2006
3) गंगाधर म्हांबरे, ग्रामीण उद्योगाच्या यशस्वी वाटाप, अक्षय प्रकाशन, पुणे, 2008
4) रविंद्र मधुकर काटोले, महिला स्वयंरोजगार, गोडवा कृषी प्रकाशन, पुणे, 2006
5) Indira Kumari. Y. and Sambasiva Rao, B. (2001). Emergence of Women SHGs and Its impact of Rural Development : A Case Study in Krishna District of Andhra Pradesh. *Indian J.Agric Econ.* 56 (3) : 485

6) Sentbil, K.V. and Sekar, V. (2004). Self-help Groups-A Movement for Women empowerment. *Kisan World*. 31 (7):13-14

7) Census of India 2011

8) Socio-economic Abstract of Pune District

Webliography

1) http://www.maharashtra.gov.in

2) http://www.pune.nic.in

3) https://www.mavimindia.org